# कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

नवीन आकृतिबंधानुसार वर्ष १९७६-७७ पासून कनिष्ठ महाविद्यालयीन टप्पा आस्तित्वात आल्यापासून या स्तरावरील विद्यार्थ्यांना खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्यात येते. माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये कमीत कमी ६० टक्के गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार ही शिष्यवृत्ती देण्यात येते. विद्यार्थ्यांच्या समाधानकारक प्रगती आणि कनिष्ठ महाविद्यालय पहिल्या वर्षाच्या (इयत्ता ११ वी च्या) अखेरीस घेण्यात येणा-या परीक्षेत ४५ टक्के गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्या पुढे चालू राहतात. शासन निर्णय दिनांक १५/१०/९६ अन्वये सदरहू शिष्यवृत्तीचे दर दरमहा रुपये २५ ऐवजी दरमहा ५० याप्रमाणे सुधारले आहेत. त्याचप्रमाणे शिष्यवृत्ती संचात ही वाढ केलेली आहे. १९९८-९९ पासून या योजनेखाली ४८०० संच मंजूर आहेत.

| अ.क्रं. | योजनेचे नांव | लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्या (योजनेत्तर योजना) | २२०२ सर्वसाधारण शिक्षण ०२ माध्यमिक शिक्षण १०७ शिष्यवृत्या (०१)(०१) माध्यमिक शाळांमधील शिष्यवृत्या (०३) (०१)कनिष्ठ महाविद्यालयातील शिष्यवृत्या (२२०२ ०३७१) ३४ शिष्यवृत्या / विद्यावेतन |